# पाणी बील थकवणाऱ्यांचा पाणी पुरवठा होणार खंडित

**ठाणे** :- ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे पाणी बील न भरणाऱ्या ग्राहकांचा पाणी पुरवठा खंडित करण्यात येत आहे. बुधवारी दिवसभरात १२९ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. वर्षभरात पाणी पुरवठा विभागाने एकून १२७१० जोडण्या खंडित केल्या आहेत. दिवसभरात दोन कोटी रुपयांहून अधिक बिलांची वसुली करण्यात आली...(पान ६ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ३५
epaper.diwanews.com
www.diwanews.com ♦ सोमवार, ३१ मार्च २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्याची 'हवा' ही बिघडली आणि आवाजही वाढला

## ठामपा पर्यावरण अहवालातून धक्कादायक बाब पुढे

ठाणे: ठाणे महापालिका हद्दीतील दिवा शहर पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरताना दिसत आहे. निमित्तही तसेच आहे. ठाणे महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत नुकताच प्रकाशित केलेल्या पर्यावरण अहवालावरूनच समोर आले आहे. त्या अहवालात ठाणे शहराप्रमाणे दिवा शहराची हवा बिघडलीच नाहीतर दिव्याचा आवाजही वाढल्याचे त्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे. यामध्ये प्रामुख्याने दिव्यातील दिवा डम्पिंग, दिवा स्टेशन येथे हवा प्रदूषणाची पातळी मध्यम प्रदुषित गटात मोडली गेली असून दिवा डम्पिंग नाका आणि दातीवली विसर्जन घाट हे दोन ठिकाण ध्वनी प्रदूषण प्रखरतेने वाढले आहे. याबाबी दिवेकरांच्या आरोग्याबाबत धोक्याची घंटा तर वाजवत नाही अशी चर्चा सुरू आहे.


संग्रहीत फोटो

ठाणे महापालिकेच्या माध्यमातुन नुकताच २०२३-२४ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सादर झाला आहे. ठाणे महापालिकेच्या प्रदुषण नियंत्रण विभागाने हवा गणुवत्ता मापनासाठी निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा तीन क्षेत्राची विभागणी केली होती. तेथील हवेतील प्रदुषकांचे मापन करण्यात आले. शिवाय हवेची गुणवत्ता मानप करण्यासाठी शहरातील हवा प्रदुषकांचे हॉटस्पॉटचे निरिक्षण करण्यात आले. तसेच दिवा डम्पींग ग्राऊंड, दिवाळी सणाच्या कालावधीत व नंतर हवा प्रदुषणात वाढ झाली का? याचे देखील निरिक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार शहरातील ३० हॉटस्पॉट नाक्यांचे मापन करण्यात आले आहे. यात ३० पैकी २३ नाक्यावरील हवा ही मध्यम प्रदुषित गटात मोडल्याचे दिसून आले. यामध्ये नितीन कंपनी, किसननगर नाका, शास्त्री नगर, बाळकुम, गावदेवी नाका, लोकमान्य नगर, विटावा, कोर्ट नाका, कापुरबावडी नाका, शिळफाटा, दिवा

### दिवा न्यूज विशेष

डम्पींग ग्राऊंड, जांभळी नाका, इंदिरा नगर, वर्तक नगर, ढोकाळी मार्केट, कासारवडवली मार्केट, कळवा भाजी मार्केट, मुंब्रा स्टेशन, दिवा स्टेशन, कोपरी राऊत शाळा, तीन हात नाका, सॅटीस नौपाडा आदी भागांचा समावेश आहे. याठिकाणी वाहनांची वर्दळ, वाहतुक कोंडी, घोडबंदर भागात सुरु असलेली मेट्रोची कामे आदींमुळेच येथील प्रदुषणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तेथील मध्यम प्रदुषित गटाची हवेची गुणवत्ता ही १०० पेक्षा अधिक आढळून आली आहे.

**दिव्याची हवा बिघडण्यास डम्पिंग वरील आगी आणि दुर्गंधी कारणीभूत.....**

ठाणे शहराप्रमाणे दिव्यातील हवा प्रदुषण हे मध्यम प्रदुषित गटात मोडली गेली आहे. त्यातच दिवा डम्पिंग जरी बंद झाले असेल तरी, तेथे वारंवार लागण्यारा आगीच्या घटना तसेच डम्पिंगवरील दुर्गंधी अद्यापही बंद झालेली नसल्याचे दिसून आले आहे. ही प्रमुख कारणे आहेत.



### ठामपा हद्दीत येथे ध्वनी प्रदूषणच्या नोंदी...

शहरातील शांतता क्षेत्रातही ध्वनी प्रदुषणात लक्षणीय वाढ झाल्याचे त्या अहवालात म्हटले आहे. दिव्यात ध्वनिप्रदूषण मोठया प्रमाणात होत असल्याचे मत नागरिक व्यक्त करतात.ठाण्यात २० ठिकाणी गणेशोत्सव विसर्जन केले जात आहे. त्या सर्वच ठिकाणी ही ध्वनीची तीव्रता ही मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्याची धक्कादायक पुढे आली आहे. त्यातही कळवा विसर्जन घाट, रेती बंदर विसर्जन, खारेगाव विसर्जन घाट आणि दातीवली विसर्जन घाट येथे ध्वनीची पातळी अधिक वाढल्याचे दिसून आले आहे.

या चौकात ध्वनी प्रदुषणात दिसते वाढ...

ठाण्यातील कॅडबरी नाका, नितिन कंपनी, मुलुंड चेक नाका, शास्त्री नगर नाका, उपवन बस डेपो, गावदेवी नाका, ब्रम्हांड, शिळफाटा, कल्याणफाटा, जांभळी नाका, दिवा डम्पींग, कळवा भाजी मार्केट, सॅटीस नौपाडा या भागातील ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

शहरातील ३० हॉटस्पॉट नाक्यांचे मापन करण्यात आले आहे. यात ३० पैकी २३ नाक्यावरील हवा ही मध्यम प्रदुषित गटात मोडल्याचे दिसून आले. यामध्ये नितीन कंपनी, किसननगर नाका, शास्त्री नगर, बाळकुम, गावदेवी नाका, लोकमान्य नगर, विटावा, कोर्ट नाका, कापुरबावडी नाका, शिळफाटा, दिवा डम्पींग ग्राऊंड, जांभळी नाका, इंदिरा नगर, वर्तक नगर, ढोकाळी मार्केट, कासारवडवली मार्केट, कळवा भाजी मार्केट, मुंब्रा स्टेशन, दिवा स्टेशन, कोपरी राऊत शाळा, तीन हात नाका, सॅटीस नौपाडा आदी भागांचा समावेश आहे.

# झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्याचे काम मार्चपासून सुरू

## अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली माहिती

**ठाणे** :-दरवर्षी ठाणे महानगरपालिकेतर्फे पावसाळ्यापूर्वी मे व जून महिन्यामध्ये झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी केली जाते. मात्र पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे व अन्य नैसर्गिक कारणांमुळे काही झाडे उन्मळून पडतात, ज्यामुळे नागरिकांच्या जिवास व मालमत्तेस धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर, संभाव्य धोके टाळण्यासाठी यावर्षी नियोजित वेळेच्या दोन महिने आधीपासूनच म्हणजेच, मार्च महिन्यापासूनच धोकादायक फांद्या काढण्याच्या मोहीमेची सुरुवात करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, शहरातील प्रमुख रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, शाळा, रुग्णालये, उद्याने, चौक, बस स्टॉप आणि रहिवासी परिसरातील धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत आहे. पावसाळ्यात विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्यांचा संपर्क होवून अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन तांत्रिक दृष्टीने ही छाटणी केली जात आहे. त्यासाठी प्रभाग समितीनिहाय सर्वेक्षण करण्यात आले असून सुमारे ६३६७ झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्यात येत आहेत, असे अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी स्पष्ट केले.

या मोहिमेची माहिती देण्यासाठी महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात गुरूवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (उद्यान) मधुकर बोडके, वृक्ष अधिकारी राजेश सोनावणे, वरिष्ठ उद्यान अधिक्षक केदार पाटील उपस्थित होते. नौपाडा-कोपरी (९५४), उथळसर (७९८), लोकमान्य नगर-सावरकर नगर (७८७), वागळे (७३७), माजिवडा-मानपाडा (१०९१), वर्तकनगर (१३०१), कळवा (४२३), मुंब्रा आणि दिवा (२७६) येथे झाडांचे सर्वेक्षण झाले आहे. याशिवाय, आतापर्यंत, सुकलेली सुमारे १५० झाडे निर्दशनास आली असून त्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती झाडेही तोडण्यात येणार आहेत. उन्हाळ्यात झाडांच्या सावलीचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांना मिळावा व झाडांची नैसर्गिक वाढ अबाधित रहावी, यासाठी अत्यावश्यक असेल तेथेच धोकादायक फांद्यांची छाटणी केली जात आहे.

या दरम्यान, झाडांवरील पक्षांची घरटी व इतर जैवविविधता सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष काळजी घेतली जात असल्याचेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी सांगितले. वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभागातील माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांच्याशीही या मोहिमेबाबत संपर्क साधण्यात आला आहे. त्यांच्याशी समन्वय साधून आवश्यक त्या ठिकाणी झाडांच्या धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत असल्याचेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी नमूद केले. यातून निर्माण होणारा हरित कचरा संकलित करुन शास्त्रशुध्द पध्दतीने सेंद्रिय खत



### संभाव्य धोके व नुकसान टाळण्यासाठी ठाणे महापालिकेचे नियोजन

निर्मितीकरिता ठाणे महानगरपालिकेच्या कोपरी येथील हरित कचरा व्यवस्थापन केंद्राकडे पाठविण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, महापालिकेच्या उद्यान विभागाने धोकादायक, सुकलेल्या झाडांचे सर्वेक्षण केलेले आहे. तरीही नागरिकांनीही परिसरातील धोकादायक झाडांबाबत ठाणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागास त्वरित माहिती द्यावी. ही मोहीम केवळ झाडांची छाटणी करण्यापूर्ती मर्यादित न राहता शहरातील हरित क्षेत्र टिकविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. या मोहीमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्य करावे, असे यावेळी अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधीमंडळात घोषणा

## फनेल क्षेत्रातील इमारतींच्या पुनर्विकासाला वेग येणार

**मुंबई**: -मुंबईतील सांताक्रूझ, पार्ले व कुर्ला या भागात विमानतळाच्या फनेल झोनमधील उंचीच्या निर्बधांमुळे बाधित इमारतींचा पुनर्विकासास चालना मिळावी यासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. उंचीच्या निबंर्धामुळे जर जागेवर वापरात येणे शक्य नसल्यास तर तेवढया क्षेत्राचा टिडीआर मालकाला उपलब्ध करुन देण्याचा पुरोगामी निर्णय घेण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केली. यामुळे निर्बंध असलेल्या बृहन्मुंबई क्षेत्रातील बाधित क्षेत्रातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य होणार असल्याचे उमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यासंदर्भात निवेदन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या विमानतळ फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता नियमावलीमध्ये विशिष्ट तरतूद करण्यासाठी बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद करण्याकरिता मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार बेसिक चटई क्षेत्र / अधिकृत इमारतीने व्याप्त क्षेत्र यापैकी जो जास्त असेल त्या क्षेत्राचा पुनर्विकासात वापर करण्याचा अधिकार समजून असे क्षेत्र उंचीचे निबंर्धामुळे जर जागेवर वापरात येणे शक्य नसल्यास तर तेवढया क्षेत्राचा टिडीआर मालकास उपलब्ध करुन देण्याचा पुरोगामी निर्णय घेण्यात आल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच ओपन स्पेस मधील कमतरता क्षमापीत करण्यासाठी व जीना, लिफ्ट इत्यादीचा चटई क्षेत्र निर्देशांकात समावेश न करण्याकरीता भरावयाचे अधिमूल्य सवलतीच्या दराने आकारण्याबाबत देखील निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) अन्वये फेरबदलाची सूचना जाहिर करण्यात



### मुंबईतील फनेल झोन मधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी डीसीपीआरमध्ये स्वतंत्र तरतूद
### टिडीआर मालकाला देण्याचा ऐतिहासिक निर्णय

येत आहे. या फेरबदलामुळे फनेल झोनमधील, तसेच अशा प्रकारे निर्बंध असलेल्या बृहन्मुंबई क्षेत्रातील इतर बाधित क्षेत्रातील जुन्या इमारतींचे पुनर्विकास सुसह्य होणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक -सुहास शांताराम खंडागळे** **RNI No.-MAHMAR/2021/80669**

# एसटी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : - ए**स टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली. सदस्य उमा खापरे यांनी पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील प्रदूषणाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये शशिकांत शिंदे, प्रविण दरेकर, अनिल परब, अमित गोरखे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला. एसटी महामंडळाकरिता ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापैकी ४५० बसेस खरेदी केल्या आहेत. तसेच एसटीच्या सध्याच्या बसेस एलएनजीमध्ये परावर्तीत करण्यात येणार असून एलएनजी पुरवठा करण्यासाठी करार करण्यात आला आहे. राज्यात ईव्हीच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ईव्ही धोरण आणले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर आकारण्याचे जाहीर केले आहे. परंतु हा कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात करण्यात येणार आहे. राज्यातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के ईव्ही वाहने होतील यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढला की प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. तसेच हिंजवडी परिसरातील होणारे प्रदूषण हे मुख्यत: वाहनांमुळे होत असून यासाठी मेट्रो आणि बसेसची कनेक्टिव्हीटी सुरू करण्यात येत आहे. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषण मुक्त असावी असे शासनाचे धोरण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रिक करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमदारांनाही देण्यात येणाऱ्या वाहन कर्जावरील व्याज सवलतीही ईव्हीसाठीच देण्यात येतील. सर्व मंत्री यांची वाहनेही ईव्हीमध्ये बदलण्याचे शासनाचे नियोजन असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, रेडीमिक्स प्लांटना पूर्ण अच्छादन करण्याचा नियम शासनाने केला आहे. हिजंवडी परीसरात असलेल्या या रेडीमिक्स प्लांटलाही हा नियम लागू आहे. अशा प्रकारे पूर्ण अच्छादन न करणारे प्रकल्प बंद करण्याची कार्यावाही करण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेला प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या १७२ कोटी रुपयांच्या निधीच्या विनियोगबाबतही चौकशी करण्यात येईल, अशी माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

# ठाण्यात मुक्ती दिन उत्साहात साजरा ; यंदाचे ११ वे वर्ष

**ठाणे :** -सह्याद्री प्रतिष्ठानचे राष्ट्रीय कार्यकारणी अध्यक्ष, आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सह्याद्री प्रतिष्ठान ठाणे जिल्हा तर्फे ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहात 'ठाणे मुक्ती दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाचे हे ११ वे वर्ष होते.




या कार्यक्रमाला आ. केळकर यांच्यासह, आमदार निरंजन डावखरे, दुर्गरत्न श्रमिक गोजमगुंडे, इतिहासकार मकरंद जोशी, कारागृहाच्या अधीक्षक राणी भोसले, उपाधीक्षक श्री.भोसले, ठा म पा परिवहन सदस्य विकास पाटील, सह्याद्री प्रतिष्ठानचे ठाणे जिल्हा अध्यक्ष महेश विनेरकर, अरिफ बडगुजर, संतोष साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे, चिमाजी अप्पा, बलकवडे, अंजूरकर, नाईक, ढमढेरे यांच्या तसबीरीना पुष्पहार घालून फुले वाहण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव च्या जयघोशाने वातावरण शिवमय झाले होते. आमदार संजय केळकर यांनी २७ मार्च १७३७ रोजी आपले ठाणे पोर्तुगीज्यांच्या जोखडीतून मुक्त झाले, २८८ वर्ष पूर्ण झाली. त्याची आठवण म्हणून 'ठाणे मुक्ती दिन' साजरा केला जातो असे सांगून, सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक दुर्गरत्न श्रमिक गोजमगुंडे यांच्याही कामाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जर जिवंत ठेवायचा असेल तर त्यांनी बांधलेल्या गडकिल्यांचे आपण संरक्षण केले पाहिजे, कायम राहतील असे बघितले पाहिजे. माझ्या मार्गदर्शनाखाली २५ संघटनांची एकत्रित नुकतीच सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्यासह बैठक झाली त्यात गडकिल्ल्याविषयी, दुर्गसांवर्धनबाबत तर चर्चा झालीच पण महत्वाचे १२ किल्ल्याना जागतिक वारसा मिळावा याकरिता प्रयत्न सुरु असल्याचे आ. केळकर यांनी सांगितले. सह्याद्री प्रतिष्ठान ही सर्वात मोठी संस्था असून त्याचे काम दूरवर सुरु आहे. ३०००० च्या वर प्रतिष्ठानचे सभासद आहेत. आमदार निरंजन डावखरे यांनी जो ईतिहास विसरतो त्याचे भवितव्य निश्चितच अंधारमय असतं असे सांगून शालेय विध्यार्थ्यांना अशा कार्यक्रमात आणून इतिहास सांगितला पाहिजे असे मत व्यक्त केले. इतिहासकार मकरंद जोशी यांनी ठाणे मुक्ती दिन बाबत माहिती दिली. तर दुर्गरत्न श्रमिक गोजमगुंडे यांनी देखील गडकिल्ल्यासंदर्भात व सह्याद्री प्रतिष्ठान बाबत माहिती देऊन गडावर जीर्ण झालेले पुरातन मंदिराचे जीर्णोद्धार हे सह्याद्री प्रतिष्ठान मार्फत सुरु असल्याचे सांगितले.

कारागृहाच्या अधीक्षक राणी भोसले यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश कोळी यांनी केले.

# नगर पथ विक्रेता (फेरीवाला) समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू
## ११ एप्रिल रोजी होणार मतदान आणि मतमोजणी

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नगर पथ विक्रेता (फेरीवाला) समितीवरील आठ प्रतिनिधींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. बुधवार, २६ मार्च रोजी महापालिका मुख्यालय, प्रभाग समिती कार्यालय तसेच ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर प्रभाग समितीनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. शुक्रवार, ११ एप्रिल रोजी स. ११ ते सायं. ५ या वेळेत प्रभाग समिती कार्यालयात मतदान होणार असून मतमोजणी त्याच दिवशी महापालिका मुख्यालयात होणार आहे.

पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम २०१६ नुसार ठाणे महापालिका पथ विक्रेता समितीमधील पथ विक्रेत्यांच्या प्रतिनिधींची नगर पथ विक्रेता समितीचे सदस्य म्हणून नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून ५ वर्षांच्या कालावधीसाठी निवडणूक होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रबोधन मवाडे यांनी जाहीर केले आहे.

नगर पथ विक्रेता समितीच्या निवडणुकीसाठी १३६५ मतदारांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. या सर्व मतदारांनी निवडणुकीत सक्रिय सहभाग घेऊन ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव आणि निवडणूक निर्णय अधिकारी प्रबोधन मवाडे यांनी केले आहे.

**आठ जागांसाठी होणार मतदान**

सर्वसाधारण गट
(महिला राखीव) - ०३
अनुसूचित जाती
(महिला राखीव) - ०१
अनुसूचित जमाती - ०१
इतर मागास वर्ग - ०१
अल्पसंख्याक - ०१
विकलांग व्यक्ती
(महिला राखीव) - ०१
**एकूण जागा - ०८**

# पन्हाळा किल्ल्यावरील शिवस्मारकाला १० कोटींचा निधी मंजूर

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून शिवप्रेमींच्या मागणीला तत्काळ मंजुरी

**मुंबई** :- कोल्हापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक पन्हाळा किल्ल्यावरील शिवस्मारकाच्या उभारणीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नगरविकास विभागाच्या माध्यमातून १० कोटींचा निधी मंजूर केला आहे. विधानभवनात आज झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील आमदारांची आणि लाखो शिवप्रेमींची ही मागणी मान्य करत शिवस्मारकाचा कामासाठी तत्काळ १० कोटींच्या निधीला मंजुरी दिली. याबाबतीतला शासन निर्णय तत्काळ काढण्यात येऊन तो या आमदारांना सुपूर्द करण्यात आला. या निर्णयामुळे पन्हाळा किल्ल्यावर छत्रपतींचे स्मारक असावे अशी इच्छा बाळगणाऱ्या लाखो शिवप्रेमींची इच्छा पूर्ण होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यात पन्हाळा किल्ल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वत: महाराजांनी या किल्ल्यावर १३३ दिवस वास्तव्य केले होते. तसेच सिद्धी जोहरने टाकलेला पन्हाळ्याचा वेढा असेल, बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सेनेने दिलेले बलिदान असेल किंवा त्यानंतर स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराजांचे वास्तव्य असेल असे ऐतिहासिक महत्त्व या किल्ल्याला आहे. मात्र तरीही या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा एकही पुतळा नसल्याने याठिकाणी शिवस्मारक व्हावे अशी मागणी करण्यात येत होती. पन्हाळा किल्ल्यावर शिवछत्रपतींचे स्मारक असावे ही मागणी पहिल्यांदा करण्यात आल्यानंतर त्यावेळेसचे अर्थमंत्री अजित पवार यांनी या कामासाठी ५ कोटींचा निधी मंजूर केला होता. पन्हाळा किल्ल्यावरील तळ्याच्या मध्यभागी चौथरा बांधून त्यात हे स्मारक उभारण्यात येणार होते. मात्र काही कारणांमुळे शिवस्मारकाचे हे काम पूर्ण होऊ शकले नाही. अखेर कोल्हापूरचे आमदार चंद्रदीप नरके, राजेश क्षीरसागर, प्रकाश अबीटकर यांनी आता पुन्हा या मागणीचा पाठपुरावा केला. यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना आणि इतर अधिकारी उपस्थित होते.



कोल्हापूरमधील आमदारांच्या पाठपुराव्याला यश

# अकृषिक कर कायम रद्द; नोटीसांकडे करा दुर्लक्ष..

**ठाणे** : -शहरी भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्ता कराबरोबरच महसूल विभागाकडून नागरिकांना लाखो रुपयांच्या अकृषिक कराच्या नोटीसा बजावण्यात येत आहेत. मात्र अकृषिक कर कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली असून नागरिकांनी या नोटीसांकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन आमदार संजय केळकर यांनी केले आहे.

ग्रामीण भागात सुरू असलेला अकृषिक कर शहरी भागातही गेल्या अनेक वर्षांपासून आकारण्यात येत असून शहरी नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांचा मालमत्ता कर भरताना नाहक अकृषिक कराच्या नोटीसांचा सामना करावा लागत आहे. सर्वसामान्य दुकानदार, घरे, इमारती, कार्यालये यांना लाखो रुपयांच्या नोटीसा बजावण्यात येत असल्याने ते हवालदिल झाले होते. आमदार संजय केळकर हे गेल्या काही वर्षांपासून या अकृषिक कराविरोधात लढा देत असून अधिवेशनात आवाज उठवत आहेत.

त्यांच्या लढ्याला यश आले असून हा कर कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मात्र आजही महसूल विभागाकडून अकृषिक कर भरण्याबाबतच्या नोटीसा प्राप्त होत असल्याने नागरिक संभ्रमात पडले होते. याबाबत आमदार संजय केळकर यांनी सध्या सुरू असलेल्या अधिवेशनात आवाज

**आमदार संजय केळकर यांचे आवाहन..**

उठवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी हा कर ४ ऑक्टोबर २०२४ रोजीच कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याची माहिती सभागृहात काल दिली. श्री. फडणविस यांनी केलेल्या या घोषणेची माहिती देताना श्री.केळकर यांनी अशा प्राप्त झालेल्या नोटीसांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन केले आहे तसेच अकृषिक कर कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याबाबत लाखो नागरिकांच्या वतीने महायुती सरकारचे आभार मानले आहेत. न्यू इंडिया बँकेतील खातेदार सोसायट्यांना सूट द्या - आ.केळकर

बंद पडलेल्या न्यू इंडिया ?श्युरन्स बँकेत खातेदार असलेल्या ठाण्यातील शेकडो सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्थानिक कर भरण्याबाबत सूट द्यावी, अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी केली. बंद पडलेल्या न्यू इंडिया ?श्युरन्स बँकेच्या ठाण्यात दोन शाखा असून १० ते १५ हजार ठेवीदार आहेत. बँक बंद पडल्याने खात्यातून पैसे काढण्यावर निर्बंध आल्याने खातेदारांना विविध कारणांसाठी धनादेशाद्वारे पैसे अदा करता येत नाहीत. बहुतांशी गृहसंकुलांची खाती या बँकेत असल्याने महापालिकेचा मालमत्ता कर, पाणीपट्टी आदी भरणा करताना सोसायट्यांना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे कर भरणा किंवा बिले भरण्याबाबत मुदतवाढ दिल्यास त्यांच्यावरील संभावित कारवाई टळेल, अशी मागणी करत आमदार केळकर यांनी बंद पडलेल्या बँकांसदर्भात पाच लाखांच्या हमीपात्र रकमेत वाढ करण्याची मागणीही केली.

# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ठाणे जिल्ह्याचे यश



**ठाणे**:- विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने भारत सरकारच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु करण्यात आली आहेत. या विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सी. बी. एस. सी. ई पॅटर्न च्या धर्तीवर बारावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. तर ? संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण ? भागातील विद्यार्थ्यांच्या ३० जागांपैकी शहापूर तालुक्यातील २१ पात्र विद्यार्थी, मुरबाड तालुक्यातील ०१ पात्र विद्यार्थी, भिवंडी तालुक्यातील- ०१ पात्र विद्यार्थी असे एकूण - २३ पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ३० जागांपैकी २३ जागेवर पात्र विद्यार्थ्यांची निवड झाली आणि शहापूर तालुक्यातील २१ विद्यार्थ्यांची निवड झाली ही आनंदाची बाब आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या आहेत. ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी नवोदय विद्यालयात इयत्ता ६ वी च्या एकूण ८० जागा आहेत. त्यापैकी ६० जागा ग्रामीण भागासाठी व २० जागा शहरी भागासाठी असतात. यात ठाणे जिल्ह्यासाठी ग्रामीण भागासाठी ३० जागा व शहरी भागासाठी १० जागा राखीव असतात. संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ३० जागांपैकी २३ पात्र विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी (शिक्षण), गटशिक्षाधिकारी या सर्वांना शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ठाण्यात एकाच रात्री १४ दुकाने फोडणारी नेपाळी दुकली जेरबंद ; ठाणे, मुंबई, नवीमुंबईतील ९ गुन्हे उघडकीस

**ठाणे:-** नौपाडा, चरई परिसरात एकाच रात्रीत तब्बल १४ दुकाने फोडणाऱ्या नेपाळीमधील महंन्त भाने कामी (२३) आणि विष्णु रगुवा कामी (३६) या दुकलीला ठाणे गुन्हे शाखेने मोठ्या शिताफीने बेड्या घातल्या आहेत. ते दोघे वॉचमन असून त्यांच्याकडून ठाणे, मुंबई व नवी मुंबई परिसरातील एकूण ०९ गुन्हे उघडकीस आणण्यात ठाणे पोलिसांना यश आले आहे. याशिवाय त्या गुन्ह्यांमधील दोन लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली. चरई परिसरात १२ मार्च २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास एकाच रात्रीत सलग १४ दुकानांचे शटर उचकटुन / वाकवून चोरी केल्याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणाचा नौपाडा आणि गुन्हे शाखेच्या मार्फत समांतर सुरू होता. दरम्यान त्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने गुन्हा केलेल्या व्यक्तीच्या वर्णनावरून त्यांचे ठाणे रेल्वेस्टेशन ते मिरारोड व उल्हासनगर या मार्गाक्रमणातील एकूण ९० ते १०० सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पडताळणी केली. तसेच तांत्रिक विश्लेषणामध्ये आरोपी हे गुन्हा केल्यानंतर वेगवेगळ्या मार्गाने घटनास्थळावरून निघुन गेल्याची माहिती समोर आली. शिवाय स्थानिक रिक्षा चालक, हॉटेल व्यवसायीक यांच्याकडे अधिक तपास केल्यावर २० मार्च रोजी त्यांना अटक केली. त्या चौकशीत त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. तसेच त्यांनी मुंबई आणि नवीमुंबईत गुन्ह्यांची कबुली दिली. अशाप्रकारे त्यांच्याकडून ९ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले असून त्यातील ४ मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा दोन लाख ६० हजारांची मुद्देमालासह गुन्हयात वापरलेली हत्यारे स्कु ड्रायव्हर, लोखंडी कटावणी, बॅग हस्तगत केली आहे. पुढील तपास ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक दिपक घुगे हे करीत आहेत.

**ही दुकली नेपाळी ....**

अटकेतील महंन्त आणि विष्णू हे दोघे मूळ नेपाळी आहेत. तसेच महंन्त आणि विष्णू हे वॉचमन असून एक मिरारोड आणि दुसरा उल्हासनगर येथे राहणारे आहेत. या दोघांनी ९ पैकी ४ गुन्हे केले असून इतर गुन्हे महंन्त याने इतर साथीदार लक्ष्मण सिंग, महेश देवकर, एकिंद्र सर्व राहणार मिरारोड ठाणे यांच्यासह केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. याशिवाय विष्णू विरोधात मीरा भाईंदरमध्ये एक गुन्हा दाखल असल्याचेही समोर आले.

**अशी आहे गुन्हे करण्याची पध्दत .....**

अटक महंन्त हा मार्केट परिसरात असलेल्या बंद दुकानांचे शटर उचकटुन व वाकवुन त्याच्यावाटे आत प्रवेश करुन घरफोडी चोरी करतो. तसेच विष्णू हा लांब उभा राहुन रेकी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**ठाणे गुन्हे शाखेची कामगिरी**



**या केली कामगिरी यशस्वी**

गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे शेखर बागडे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड, सहायक पोलीस निरीक्षक विकास सुर्यवंशी, पोलीस उप निरीक्षक दिपक घुगे, सहायक पोलीस उप निरीक्षक दिपक जाधव, दयानंद नाईक, सुनिल माने, पोलीस हवालदार संदीप महाडीक, प्रशांत निकुंभ, दिपक जाधव, नंदकुमार पाटील, शशिकांत सावंत, पोलीस शिपाई सागर सुरळकर यांनी केली आहे.

# महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला नवी गती !

## विदर्भ आणि मराठवाड्यात उद्योगांना मिळणार चालना

**नवी दिल्ली** :- महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना देणारा निर्णय महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या बैठकीत एकूण ?३,९२,०५६ कोटी गुंतवणुकीच्या १७ महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली. या गुंतवणुकीतून राज्यात १,११,७२५ प्रत्यक्ष आणि २.५ ते ३ लाख अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. विशेषतः विदर्भ आणि मराठवाडा भागाला याचा मोठा फायदा होणार आहे. या निर्णयावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्य वरिष्ठ मंत्री उपस्थित होते. यामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळाली असून राज्यात अनेक महत्त्वाच्या उद्योग प्रकल्पांना सरकारकडून मंजूरी मिळाली आहे. नागपूर,

**दावोस २०२५ मध्ये स्वाक्षरी झालेल्या ५१ करारांपैकी १७ ला मंजुरी,एकूण गुंतवणूक ३,९२,०५६ कोटी**

गडचिरोली, चंद्रपूर, पुणे, रायगड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात हजारो रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी आणि मिहान या औद्योगिक क्षेत्रांमध्ये सौर ऊर्जा आणि लिथियम बॅटरी उत्पादन प्रकल्पांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. पावर इन एनर्जी इंडिया कंपनी बुटीबोरी येथे सौर ऊर्जा उपकरणांसाठी १५,२९९ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून यामुळे ४,५०० लोकांना रोजगार मिळणार आहे. तसेच, वर्धन लिथियम कंपनी नागपुरात लिथियम बॅटरी आणि रिफायनरी प्रकल्पासाठी ४२,५३२ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, ज्यामुळे ६,००० लोकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून बुटीबोरी येथे लिथियम आयरन फॉस्फेट बॅटरी उत्पादनासाठी २०,९४१ कोटींची गुंतवणूक केली जात आहे, यामुळे ७,००० रोजगार निर्माण होतील. याशिवाय, कंपनी सोलर पीव्ही वेफर आणि सेल उत्पादनासाठी २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, ज्यामुळे ६,९०० लोकांना रोजगार मिळू शकेल. वारी एनर्जीज कंपनीही नागपुरात सौर ऊर्जा उपकरण निर्मितीमध्ये ३०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहे आणि त्यामुळे तब्बल १५,००० लोकांना रोजगाराच्या संधी मिळणार आहेत.

# स्व.पल्लवी सरोदे यांच्या स्मरणार्थ जिल्हा माहिती कार्यालयातर्फे कमळ व वॉटर लिली रोपांची लागवड

**ठाणे** :- शासनाच्या १०० अंतर्गत शासकीय कार्यालयांसाठी ७ कलमी कृती आराखडा लागू केला असून त्याअंतर्गत विविध लोकोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या आवारात ही संकल्पना राबविण्याचे नियोजन आहे. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक स्व.पल्लवी सरोदे यांचे दि.२३ मार्च २०२५ रोजी अपघाती निधन झाले. " उपक्रमाची सुरुवात म्हणून ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाने आज आपल्या कार्यालयाच्या आवारात स्व.पल्लवी सरोदे यांच्या स्मरणार्थ कमळ व वॉटर लिली या रोपांची लागवड केली आहे. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी, समाजसेवक मोहन शिरकर आणि जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

ही संकल्पना ठाणे शहरातील वृक्षतज्ञ श्री.विजयकुमार कट्टी यांच्या मार्गदर्शनातून साकारण्यात येत आहे. श्री.विजयकुमार कट्टी हे नागरिकांना डासविरहित परिसर ठेवण्याकरिता तसेच मानवी जीवनाकरिता इतर उपयुक्त झाडांची लागवड करण्याकरिता विनामूल्य मार्गदर्शन करतात. झाडांपासून टिकाऊ झाडांची निर्मिती व वृक्ष हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ठाणे जिल्हा प्रशासनातील कार्यालये, अधिकारी-कर्मचारी तसेच जिल्ह्यातील विविध हाऊसिंग सोसायट्या, सामाजिक संस्था, सामान्य नागरिकांना जर आपल्या परिसरात रोपांची लागवड करावयाची असल्यास वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी (७९७७५१३८२२) यांच्याशी संपर्क साधावा व पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता आपले अनमोल योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे.

# ठाण्यात कॉम्बिंग ऑपरेशन हुक्का पार्लर बंद करणार!..

ठाणे:- हुक्का पार्लर व्यवसायावर बंदी असून याबाबत गुन्हे दाखल केले तर तीन वर्षांची शिक्षा आहे, पण ठाणे शहरात हुक्का पार्लर चालकांवर असे गुन्हे पोलिसांकडून दाखल होत नाहीत, अशी खंत आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केली. यावर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी शहरात शोधमोहिम सुरू करून ठोस कारवाई करण्याचे आदेश तत्काळ देण्यात येतील, असे सांगितले. ठाणे शहरात तरुण पिढी हुक्का पार्लर संस्कृतीमुळे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. हुक्का पार्लरमुक्त ठाणे शहरासाठी लोकचळवळ उभारली, त्यास यशही मिळाले. पोलिसांनी कारवाया केल्याने ६० टक्के हुक्का पार्लर बंद झाले, पण अद्याप ४० टक्के पार्लर सुरू असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी सभागृहात दिली. शहरात थेट हुक्का पार्लर सुरू



## आमदार संजय केळकर यांच्या मुद्द्यानंतर गृहराज्यमंत्र्यांचे आदेश..

आहेतच पण हर्बलच्या नावाखाली देखील हुक्का पार्लर सुरू आहेत. एवढेच नव्हे तर परमिट रूमच्या मागे देखील हा व्यवसाय सुरू आहे. यामुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जात आहे. समाज माध्यमांवर तर छुप्या आकर्षक जाहिराती प्रसारित केल्या जात असून त्या ठिकाणी गेल्यावर हुक्का पार्लर असल्याचेच आढळून येते. या हुक्का चालकांना व्यवसाय बंद करण्याची पोलिसांकडून फक्त समज दिली जाते पण या व्यवसायावर ठोस कारवाई करण्यात पोलिस कुचराई करत असल्याचे श्री.केळकर यांनी सांगितले. ठाणेकर तरुणांना देशोधडीस लावणारे हे हुक्का पार्लर कायमस्वरूपी बंद न करण्यामागे कोणते राजकारण आहे, अर्थकारण आहे, असा संतप्त सवाल उपस्थित करत शहरात कॉम्बिंग ऑपरेशन करून हे व्यवसाय बंद करण्यात येतील का, असा प्रश्न आमदार केळकर यांनी उपस्थित केला.

यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी ठाणे शहरात शोध मोहीम सुरू करून हुक्का पार्लर बंद करण्याचे आदेश आजच देण्यात येतील, असे सांगितले.

# अचलपूर आणि परिसरातील १०५गावांसाठी वाढीव पाणीपुरवठा योजनेस गती देण्यात येणार

## पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई :- अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, चांदुर बाजार, भातकुली, अमरावती तालुक्यामधील १०५ गावांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणींमुळे विलंब झाला आहे. या योजनेच्या उर्वरित कामांना गती देऊन दरडोई ५५ लिटर्स पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

याबाबत सदस्य राजेश वानखेडे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. सदस्य नारायण कुचे यांनी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. मंत्री पाटील म्हणाले, या वाढीव पाणीपुरवठा योजनेस २०२१ मध्ये तांत्रिक मंजुरी तर २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. कामे संथ गतीने झाल्याने कंत्राटदारास दंड आकारण्यात आला आहे. या योजनेतून सध्या ८१ गावांना दरडोई ४० लिटर्स पाणीपुरवठा होत आहे. योजनेच्या उर्वरित कामांना गती देऊन डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करायचे उद्दिष्ट आहे.


# पाणी बील थकवणाऱ्यांचा पाणी पुरवठा होणार खंडित

**ठाणे** :- ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे पाणी बील न भरणाऱ्या ग्राहकांचा पाणी पुरवठा खंडित करण्यात येत आहे. बुधवारी दिवसभरात १२९ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. वर्षभरात पाणी पुरवठा विभागाने एकूण १२७९० जोडण्या खंडित केल्या आहेत. दिवसभरात दोन कोटी रुपयांहून अधिक बिलांची वसुली करण्यात आली. पाणी पुरवठा विभागातर्फे थकबाकी आणि चालू बिल वसुलीची मोहीम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली आहे. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी जास्तीत जास्त बिल वसुली करण्यात येणार आहे. मोठे गृहसंकुल, टॉवर, व्यावसायिक ग्राहक यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. वर्षभरात आतापर्यंत, १३४०२ जणांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. २३६१ मोटर पंप जप्त करण्यात आले असून ६७६ पंप रुम सील करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली नुकत्याच झालेल्या विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी विविध विभागांच्या महसुलाच्या वसुलीचा आढावा घेतला होता. तसेच, मार्चअखेरपर्यंतचा काही दिवसांचा उपलब्ध कालावधी उपयोगात आणून सर्व विभागांनी त्यांच्या वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश दिले होते.पाणी पुरवठा विभागाने या आर्थिक वर्षात आतापर्यंत थकबाकी आणि चालू बिलांच्या २२५ कोटी रुपयांपैकी १३६ कोटी रुपयांची वसुली केली आहे. ही वसुली गेल्यावर्षीच्या याच काळातील वसुलीपेक्षा १३ कोटी रुपयांनी अधिक आहे. मार्च अखेरपर्यंत थकबाकीसह पाणी बिलाची रक्कम भरणा न करणाऱ्या ग्राहकांचा पाणी पुरवठा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बंद करण्यात येणार आहे. तसेच, थकबाकीवरील प्रशासकीय आकार / दंड/ व्याज यांच्यावर लागू असलेली १०० टक्के माफीची अभय योजना पुढील वर्षी लागू होणार नाही. या अभय योजनेची मुदत ३१ मार्च, २०२५ पर्यंतच राहणार आहे.

**दिवसभरात १२९ ग्राहकांची पाणी जोडणी केली खंडित,**
**वर्षभरात १२७९० जोडण्या केल्या खंडित**
**या आर्थिक वर्षात आतापर्यंत १३६ कोटी रुपयांच्या बिलांची वसुली**
**पुढील वर्षी अभय योजना नाही**



# राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थिनी तन्वी मुळ्ये हिची वॉटरपोलो आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या शिबिरासाठी निवड



ठाणे :- ठाणे महापालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथील द्वितीय वर्ष एमबीबीएसची विद्यार्थिनी तन्वी मुळ्ये हिची अकराव्या वॉटरपोलो आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या शिबिरासाठी निवड झाली आहे.शिबिरात निवड झालेल्या देशभरातील २५ खेळाडूंमधून ऑक्टोबर २०२५मध्ये होणाऱ्या वॉटरपोलो आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी संभाव्य संघ निवड करण्यात येणार आहे. तन्वी सध्या बंगलोर येथे या शिबिरात सहभागी झालेली असून हे शिबीर महिनाभराचे आहे.तन्वी वॉटरपोलो या क्रीडा प्रकारात पारंगत असून तिने २०१९ पासून विविध कनिष्ठ आणि वरिष्ठ गटात राष्ट्रस्तरीय खेळांमध्ये सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली आहे. सन २०२३ मध्ये भुवनेश्वर झालेल्या वीस वर्षाखालील वयोगटात, आंतरराष्ट्रीय वॉटरपोलो प्रशिक्षण शिबिरातही तिला प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली होती.

पालकांच्या प्रोत्साहनामुळे लहानपणापासूनच तिने वॉटरपोलो खेळाची आवड जोपासली. त्याचबरोबर, अभ्यासाशी सांगड घालून तिने शैक्षणिक वर्ष २०२३ मध्ये ठाणे महापालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात नीट (ऩ्र्) परीक्षा देऊन प्रवेश मिळवला. राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांनीही एमबीबीएसचा अतिशय कठीण अभ्यासक्रम सांभाळत, वॉटरपोलोचा सराव चालू ठेवण्यास तिला प्रोत्साहन दिले. आंतराराष्ट्रीय स्पर्धेच्या सराव शिबिरासाठी राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीची निवड झाली ही अभिमानाची गोष्ट असल्याचे महाविद्यालयाचे डीन राकेश बारोट यांनी नमूद केले. तसेच, शिबीर यशस्वीपणे पूर्ण करून संघात निवड व्हावी यासाठी तन्वीला शुभेच्छाही दिल्या आहेत.

# गावदेवी मार्केटमध्ये कापडी पिशवीचे व्हेंडिंग मशीन

## दहा रुपयात मिळणार कापडी पिशवी




ठाणे :- प्लास्टिक पिशव्यांच्या वापरास प्रतिबंध बसावा, तसेच कापडी पिशवीचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिका आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्यातर्फे नौपाड्यातील गावदेवी मार्केट येथे कापडी पिशव्यांचे दोन व्हेंडींग मशीन बसवण्यात आले आहे. मशीनमध्ये १० रुपये टाकल्यावर ग्राहकांना त्यातून कापडी पिशवी मिळणार आहे. गावदेवी मार्केटमधील कापडी पिशव्यांच्या या मशीन्सचे उद्घाटन सोमवारी सकाळी ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आणि डिस्ट्रिक्ट ३१२४चे प्रांतपाल दिनेश मेहता यांच्या हस्ते करण्यात आले.

त्याप्रसंगी, रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थच्या अध्यक्षा मेधा जोशी, सचिव अमोल नाले, जिल्हा सचिव संतोष भिडे आदी उपस्थित होते. रोटरी क्लबच्या मदतीने आणखी काही मार्केटमध्ये अशाप्रकारचे कापडी पिशवीचे व्हेंडिंग मशीन बसविण्यात येणार असल्याचे मनीषा प्रधान यांनी सांगितले.

# बॅटरीवॅट क्षमतेमध्ये बदल केलेल्या ईव्ही बाईक्सवर कारवाई

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई:-** मुंबईमध्ये बॅटरी वॅट क्षमतेमध्ये बदल करून ईव्ही बाईक रस्त्यावर चालवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा ईव्ही बाईक्सवर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते.आतापर्यंत बॅटरी क्षमतेमध्ये बदल केल्याप्रकरणी २११ गुन्हे नोंदवण्यात आल्याचे सांगून परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, अशा प्रकारे बदल केलेल्या ८८९ ईव्ही बाईक जप्त करण्यात आल्या आहेत. काही कंपन्यांकडून क्षमता वाढवून ईव्ही बाईक्स रस्त्यावर फिरवल्या जात आहेत.



# दुधात भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाईसाठी कायद्यात सुधारणा करणार -अजित पवार

## दुधातील भेसळ तपासण्यासाठी प्रत्येक विभागात प्रयोगशाळा सुरू करण्याचे निर्देश

**मुंबई :** दूध आणि तत्सम अन्नपदार्थात होणारी भेसळ ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. हे खपवून घेतले जाणार नाही. दूध आणि तत्सम अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. ?नालॉग चीज हा पदार्थ राज्यात अनेक ठिकाणी ?नालॉग पनीर या नावाने विक्री होत असल्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे उघडकीस आलेल्या दूध भेसळीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीस अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार विक्रम पाचपुते, आमदार अभिजीत पाटील, आमदार कैलास पाटील यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, वैद्यकीय शिक्षण, गृह तसेच वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.तर सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. दुधातील भेसळ तपासण्यासाठी तातडीने प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा सुरू करावी, पनीर मध्ये ?नालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. दूध भेसळीसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, भेसळीसंदर्भात जनतेला तक्रारी नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक योग्य प्रकारे कार्यान्वित करावा,पोर्टल विकसित करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये आणखी निधी देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. अन्न व औषध प्रशासन विभागातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी डेअरी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांची सेवा घेण्यात यावी, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.सोलापूर दूधभेसळ प्रकरणातील आरोपी कोणीही, कितीही मोठे असतील तरी त्यांना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना दिल्या.

